महाराष्ट्र शासन
# महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद
१७, डॉ. आंबेडकर मार्ग, पुणे - ०१
Website : www.mscepune.in Email : mscescholarship@gmail.com दूरध्वनी क्र. ०२०-२६१२३०६६/६७

## प्रसिध्दीपत्रक

संदर्भ - या कार्यालयाचे प्रसिध्दीपत्रक दि. २२/०४/२०२२.

उपरोक्त संदर्भीय प्रसिध्दीपत्रकान्वये परीक्षा परिषदेमार्फत पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ५ वी) व पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा (इ. ८ वी) ही दि. २०/०७/२०२२ रोजी राज्यातील सर्व जिल्ह्यांमध्ये एकाच दिवशी घेण्यात येणार असलेबाबत जाहिर करण्यात आले होते.

तथापि सद्यस्थितीत राज्यातील अनेक जिल्ह्यात होत असलेल्या अतिवृष्टीमुळे उद्‌भवलेली पुरसदृश्य स्थिती व बहुतांश ठिकाणी भुस्खलनामुळे वाहतूक बंद असल्याने विद्यार्थ्यांना दळणवळणास येणाऱ्या अडचणी तसेच विद्यार्थी हित व त्यांची सुरक्षा लक्षात घेता **सदर परीक्षा दि. २०/०७/२०२२ ऐवजी रविवार दि. ३१/०७/२०२२ रोजी घेण्यात येईल.**

**यापूर्वी निर्गमित करण्यात आलेले प्रवेशपत्र दि. ३१/०७/२०२२ च्या परीक्षेसाठी ग्राह्य धरण्यात येईल.**

**उपरोक्तनुसार झालेल्या बदलाची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी.**

14/7/2022
(शैलजा दराडे)
**आयुक्त**
**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषद,**
**पुणे - ०१.**

**ठिकाण - पुणे**
दि. 14/07/2022